# वसई विरार शहर महानगरपालिका


वैद्यकीय आरोग्य विभाग

महानगरपालिका मुख्य कार्यालय, 'ए' विंग,

सातवा मजला, यशवंत नगर, विरार (प.) ता. वसई, जि. पालघर – ४०१ ३०३

Email ld-nuhmvvcmc01@gmail.com


जा. क्र. वविशम/वैआवि /५८९/२०२४

दि.२२/०८/२०२४

**राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत दि. ०१/०१/२०२४ रोजी कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची सेवा जेष्ठता यादीबाबत सुचना**

मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र जा.क्र. एचएचएम- ११२४/प्र.क्र.२४५/ आरोग्य -७ दि. ३०/०७/२०२४ अन्वये राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत दि. ०१/०१/२०२४ रोजी कार्यरत असलेल्या कंत्राटी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची सेवा जेष्ठता यादी तयार करण्याबाबत मार्गदर्शक सुचना प्राप्त झाल्या आहेत. या अनुषंगाने मा. सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य भवन, मुंबई यांचे पत्र जा. क्र. राआसो/आस्था/सेवा जेष्ठता यादी/४३१४४-४८३/२०२४ दि. ३१/०७/२०२४ अन्वये सदर शासन मार्गदर्शक सुचनांना अधिन राहून महानगरपालिकेतील राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत दि. ०१/०१/२०२४ रोजी कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची विहीत नमुन्यात सेवा जेष्ठता यादी प्रसिद्ध करण्याबाबत सुचित केले आहे.

त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेतील राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत दि.०१/०१/२०२४ रोजी कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची विहीत नमुन्यात इंग्रजी व मराठी फॉन्टमध्ये संवर्गनिहाय तात्पुरती सेवा जेष्ठता यादी तयार करण्यात आली आहे.

सदर यादी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या www.vvcmc.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर सेवा जेष्ठता यादीमध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत दि. ०१/०१/२०२४ रोजी कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या माहितीबाबत आपली काही हरकत असल्यास सोबत जोडलेल्या आक्षेप अर्जामध्ये लेखी स्वरुपात व योग्य त्या पुराव्याचे आवश्यक दस्तऐवजासह दि.२६/०८/२०२४ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत वसई विरार शहर महानगरपालिका, वैद्यकीय आरोग्य विभाग, महानगरपालिका मुख्य कार्यालय, 'ए' विंग, सातवा मजला, यशवंत नगर, विरार (प.) ता. वसई, जि. पालघर – ४०१ ३०३ या पत्त्यावर समक्ष येऊन आक्षेप सादर करावेत. पोस्टाने, ई-मेल द्वारे अथवा अन्य मार्गाने सादर केले जाणारे आक्षेप अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नोंद घ्यावी.

योग्य त्या पुराव्यासह विहीत कालावधीत आक्षेप नोंदविण्याची जबाबदारी ही संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची असून त्याकरिता या कार्यालयाकडून इतर कोणताही पत्रव्यवहार/संपर्क केला जाणार नाही. विहित मुदती नंतर प्राप्त होणारे आक्षेप स्विकारले जाणार नाहीत. या कार्यालयास प्राप्त होणारे आक्षेप विचारात घेऊन अंतिम सेवा जेष्ठता यादी व पुढील सुचना वसई विरार शहर महानगरपालिकेच्या www.vvcmc.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्याकरिता वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी सदर संकेतस्थळास भेट देत राहावे.

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

(डॉ. भक्ती चौधरी)

प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी

वसई विरार शहर महानगरपालिका

# आक्षेप अर्ज

प्रति,　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　दि. /०८/२०२४

मा. आयुक्त,
वसई विरार शहर महानगरपालिका.

अर्जदार - ..........................................................................................

विषय - राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत .................... पदाच्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या तात्पुरत्या सेवा जेष्ठता यादीमध्ये नोंदविलेल्या माहितीबाबत आक्षेप सादर करीत असलेबाबत.

महोदय,

मी, ..............................., राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेत .............................. या पदावर कंत्राटी तत्त्वावर कार्यरत आहे.

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत ...................... या पदाच्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या सेवा जेष्ठता यादीमध्ये माझ्या नावासमोर नोंदविलेल्या माहितीबाबत खालीलप्रमाणे त्रुटया आहेत.

| अ. क्र. | यादीमध्ये नमुद माहिती | त्याऐवजी करावयाची दुरुस्ती |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |

माझ्याकडे सदर माहितीबाबत वैध दस्तएवज असून मी यासोबत पुरावा म्हणून जोडत आहे. तरी, माझ्याद्वारे सादर केलेल्या आक्षेपाबाबत योग्य तो बदल करुन घेण्यात यावा, ही नम्र विनंती.

कळावे,

सहपत्र- १) ............

२) ............

आपला / आपली विश्वासू,

(--------स्वाक्षरी----------)

(--------नाव----------)

(-------- पद----------)

राष्ट्रीय आरोग्य अभियान

वसई विरार शहर महानगरपालिका